# संस्थेतील रिक्त पदांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती (REVISED)

१. उमेदवाराचे वय जाहीरात प्रसिध्द झाल्या रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे (मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे) असावे.

२. शासन सेवेतील कर्मचा-यांकरिता सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि.१/११/२००३ नुसार वरील पदांसाठी कमाल वयोमर्यादेमध्ये वयाची पूर्णतः सुट अनुज्ञेय नाही. तथापि ज्या पदांसाठी अनुभवाची अट विहित केलेली आहे, फक्त त्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा अधिक अनुभवाचा कालावधी इतपत कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम करण्यात येईल.

३. खुल्या प्रवर्गाकरिता मागासवर्गीय उमेदवाराने (**ज्या उमेदवाराचे वय ३८ ते ४३ च्या दरम्यान आहे**) अर्ज केला तर संबंधित उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच संबंधित मागासवर्गीय उमेदवाराकडे दि.३१ मार्च २०१८ पर्यंत वैध असलेले नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४. उमेदवारासाठी मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. शासन अधिसूचना एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.२८/०३/२००५ नुसार ''अ'' - नियम ४ प्रमाणे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्ज सादर करणे आवश्यक राहिल.

६. शासननिर्णय क्र .अनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ प्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहिल.

७. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक.अनियो १००६/८७/सेवा-४ दि.१२ जानेवारी २००७ व वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो १००९/१३/सेवा-४ दि.२४ फेब्रुवारी २००९ मधील सर्व अटींची पुर्तता होत असल्यासच शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होईल.

८. अ) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि.२७ जून २०११ नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

९. ब) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहिल. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणातदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारासाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

१०. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

११. सर्व पदासाठी एमएससीआयटी अथवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण हि अनिवार्य अर्हता निश्चीत केलेली असल्याने ते प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. जर विहित प्रमाणपत्र नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रप्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.३.२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहित प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विहित मुदतीत संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

१२. वरील पदांमध्ये माहे जुलै २०१७ पर्यंत रिक्त होणा-या पदांचाही समावेश केलेला आहे.

१३. अर्ज सर्व दृष्टींनी पूर्ण असावेत आणि विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

१४. एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज करावा.

१५. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक अर्जात नमूद करावा व अद्यावत नोंद प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहिल.

१६. शासकीय/निमशासकीय अन्यथा अन्य प्रकारच्या नोकरीत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती अधिका-याचे मुलाखतीचे वेळी नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा मुलाखत नाकारली जाईल. ज्या पदासाठी केवळ लेखी परीक्षेच्या आधारे निवड करावयाची आहे अश्यांनी प्रमाणप्रत्रे तपासणीचे वेळी ना-हरकत प्रमाणप्रत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१७. अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ आवश्यक त्या प्रमाणप्रत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा असे अर्ज रद्बातल ठरविले जातील.

१८. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत उमेदवारांनी धारण केलेली अर्हताच विचारात घेतली जाईल. त्यानंतर सादर केलेली कोणतीही कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाही.

१९. उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व सविस्तर असावा.

२०. पोस्टाची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार न करता ते रद्द ठरविण्यात येतील.

२१. जाहिरातीत नमूद अर्हता किमान शैक्षणिक अर्हता दर्शवितात. त्यापेक्षा उच्च अर्हताधारक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

२२. निवड प्रक्रियेदरम्यान व तदनंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य/अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड/नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

२३. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करतांना सदर कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा, जेणेकरुन आपणांस संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

२४. पदभरतीचे संपूर्ण वेळापत्रक www.pkmkpp.in या संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल व त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२५. परीक्षेकरिता येताना उमेदवारांनी ओळखपत्र म्हणून पॅन कार्ड/आधार कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना/पासपोर्ट/मतदान कार्ड यापैकी एक पुरावा म्हणून सोबत आणावे.

२६. परीक्षेचे स्वरूप व निवड पध्दती-

अ) सर्व पदांसाठी लेखी परिक्षा अनिवार्य आहे.
ब) लेखी परिक्षा वस्तूनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल.

**प्राचार्य**
**प्रिं.के.एम.कुंदनानी फार्मसी**
**पॉलिटेक्निक, उल्हासनगर**